

शहादा येथे महिला महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मोतीलालतात्या पाटील, समवेत प्रा. विलास चव्हाण आदी.

# ज्ञानीपेक्षा चारित्र्यवान माणूस समाजाला अभिप्रेत असतो

## प्रा. विलास चव्हाण यांचे प्रतिपादन

शहादा (वार्ताहर)- ज्ञानी माणसापेक्षा चारित्र्यवान माणूस समाजाला अभिप्रेत असतो. चारित्र्यवान, ज्ञानी व तरुणांच्या आशेवर माजी राष्ट्रपती डॉ.कलाम हे २०२० पर्यंत देशाचे जगातील महासत्तेचे चित्र पाहात आहे. त्यांचे स्वप्न साकारण्यासाठी तरुणांनी संधीचा फायदा घ्यावा, असे प्रतिपादन विद्यार्थी कल्याण समितीचे संचालक प्रा.विलास चव्हाण [illegible] वरिष्ठ कला महाविद्यालय व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाने आयोजित कार्यक्रम केले.

शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मोतीलालतात्या पाटील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे व्हा.चेअरमन जयदव पाटील, संचालक रवींद्र पाटील, मणिलाल पाटील, दत्तूभाई पाटील, माजी सिनेट सदस्य सौ.सुरेखा पाटील, प्रा.आपसिंग वसावे, प्राचार्य एल.एन.चौधरी, प्राचार्य बाविस्कर, प्रा.अे.के.पाटील, पत्रकार रणजित राजपूत, पुरवठा विभागाचे शुक्ल अदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रथम मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमेचे पूजन झाले. मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. एस.एन.डी.टी कला महाविद्यालय व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त वार्षिक पारितोषिक व पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य एल.एन.चौधरी यांनी केले. प्रमुख अतिथीचा परिचय प्राचार्य बाविस्कर यांनी केले. यावेळी प्रा.विलास चव्हाण पुढे म्हणाले की, पुण्य करतो त्याचे फळ मिळत नाही तोपर्यंत पाप केले आहे असे मनाला वाटत असते. पुण्याचे फळ मिळते. त्यावेळीस वाटते आपण चांगले केले आहे. तसेच व्यक्ती हा फक्त ज्ञानी असेल आणि त्याच्यात चांगले गुण चारित्र्य नसेल तर तो अपयशी ठरतो. शास्त्रज्ञ हा माणूसकीला धरूनच चालतो म्हणून देशाचा विकास होतो.

प्रज्ञावंत माणूस म्हणजेच बुद्ध होय. मोठी माणसे वटवृक्षासारखी वाढतात. पण त्यांच्या सावलीखाली झुडपे वाढत नाही. मात्र महापुरुष वात्सल्याप्रमाणे असतात. त्यांची विचारधारा मातृत्वाच्या प्रेमाप्रमाणे असते, असे सांगून ते म्हणाले २१ व्या शतकात साधनांनी मुसंडी मारली आहे. भ्रमणध्वनी (मोबाईल) सेवेमुळे जग जवळ आले आहे. बदलत्या जगाकडे पाहिले तर पहिली माणसे आणि आताची माणसे यांच्यात बदल होत असल्याचे दिसून येते. संबधात बदल होत चालले आहे. यशस्वी होण्यासाठी डोळसपणे पहा. शहरी आणि ग्रामीण भेद आता राहिला नाही. ग्रामीण भागापर्यंत साधने पोहचली नाहीत म्हणून रडगाणे गाऊ नये. शहराच्या विद्यार्थ्यांबरोबर बौद्धिक मुकाबला करण्याची तयारी ठेवावी, असे प्रा.चव्हाण यांनी सांगितले.

मोतीलालतात्या पाटील म्हणाले की, २१ व्या शतकात प्रगतीचा आलेख वाढला आहे. कल्पनांच्या पलिकडे प्रगती होत आहे. मी पुस्तके वाचली नाही.

एक शेतकरी आहे. साधू-संतांचे-महंताचे आचार विचार विद्यार्थिनी जीवनात आत्मसात करावे, असे सांगून संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीकरिता सतत प्रयत्न करू, असे म्हणाले. सूत्रसंचलन प्रा.भूषण निकम यांनी केले. आभार प्रा.ए.के.पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कला महाविद्यालय व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# गांधीजींच्या जीवनातील वास्तव 'सत्याचे प्रयोग'मध्ये

## प्राचार्य चौधरी : 'गांधीजींचे विचार'वर चर्चासत्र


**सकाळ वृत्तसेवा**

नंदुरबार, ता. ४ : राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात आपल्या जीवनातील खरे वास्तव मांडून जगापुढे आदर्श ठेवला. त्या प्रमाणे आपणही आपल्या जीवनातील खऱ्या गोष्टी लिहून त्यांचे मनन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य एल. एन. चौधरी यांनी केले.

शहादा येथील शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सर्वोदय आश्रम, सर्वोदय मंडळ, मुंबई, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यातर्फे 'सामाजिक बदलांसाठी गांधीजींचे विचार' या विषयावर नुकतेच चर्चासत्र झाले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक चरणभाई देसाई यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. त्यात प्रमुख व्याख्याते म्हणून प्राचार्य चौधरी बोलत होते.

चर्चासत्रात नंदुरबार येथील जिजामाता महाविद्यालय, तळोदा येथील एमएसडब्ल्यू महाविद्यालय, आयएमआरडी महाविद्यालय, शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन शोधनिबंध सादर केला. प्रथम सत्राचे उद्घाटन ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक चरणभाई देसाई यांच्या हस्ते झाले. संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील अध्यक्षस्थानी होते. वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, एसएनडीटी महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल. एन. चौधरी, आयएमआरडी विभागाचे संचालक डॉ. एस. पी. गिरासे, डॉ. पितांबर सरोदे, प्रा. ए. के. पटेल, कार्यक्रम अधिकारी भूषण निकम उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात संस्थेचे उपाध्यक्ष जयदेव पाटील अध्यक्षस्थानी होती. प्रा. डॉ. पितांबर सरोदे प्रमुख व्याख्याते होते. डॉ. सरोदे यांनी गांधीजींच्या अहिंसावादी प्रणालीतून कशा प्रकारे सामाजिक बदल घडण्यास मदत झाली, याबाबत विवेचन केले. प्रा. तावडे यांनी सूत्रसंचालन केले. तिसऱ्या सत्रात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा. विलास चव्हाण अध्यक्षस्थानी होते. शेठ व्ही. के. शहा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बी. डी. पाटील यांनी गांधी तत्त्वज्ञानाबद्दल मार्गदर्शन केले. भूषण निकम यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जितेंद्र पाटील यांनी आभार मानले. चौथ्या सत्रात संस्थेचे सचिव डॉ. विलास पटेल अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ गांधीवादी डी. एच. पटेल यांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्रातील प्रत्येक सत्रात विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. त्या शोधनिबंधाच्या निष्कर्षासाठीचे कार्य डॉ. एस. पी. गिरासे यांनी केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. निकम यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. पाटील, सचिव विलास पटेल यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रा. ए. के. पटेल यांनी आभार मानले. प्रा. पठाण, प्रा. तावडे, प्रा. जितेंद्र पाटील, विनायक पाटील यांनी संयोजन केले.



**शहादा :** शहादा तालुका को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात 'सामाजिक बदलांसाठी गांधीजींचे विचार' या चर्चासत्राचे उद्घाटन करताना चरणभाई देसाई. शेजारी संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील, डॉ. पितांबर सरोदे, डी. एच. पाटील, एसएनडीटी महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल. एन. चौधरी आदी.

उपस्थित होते.

## शहादा महाविद्यालय

येथील [illegible].ता.को ऑप विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात महात्मा गांधी व [illegible]लालबहादूर शास्त्री जयंतीचे औचित्य लक्षात घेऊन विविध वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन करून कार्यक्रम साजरा करण्यात आला. दरम्यान महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एन. चौधरी, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य ए.के. पटेल यांनी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या जीवनचरित्र्या बद्दल आपले विचार प्रकट केले. यावेळी विद्यार्थ्यांमधून रवींद्र महाजन या विद्यार्थ्याने मनोगत व्यक्त केले. प्रा.भूषण निकम यांनी गांधीजींच्या चरित्र्याबद्दल माहिती देऊन गांधीजींनी दिलेली प्रतिज्ञा विद्यार्थ्यांना दिली. ५ ऑक्टो २००८ लोकमत


# संगणकीय प्रयोगशाळेचे शहादा येथे उद्‍घाटन

सकाळ १० ऑक्टो २००७ (बुधवार)

शहादा, ता. ९ (बातमीदार) : येथील शहादा तालुका को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वरिष्ठ महाविद्यालयात वातानुकूलित संगणकीय प्रयोगशाळेचे उद्‍घाटन नुकतेच झाले. वन विभागाचे उपविभागीय अधिकारी एन. आर. प्रवीण, संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष डॉ. आबासाहेब पाटील, सचिव सजन पाटील, सदस्य रामकृष्ण पाटील आदी उपस्थित होते. प्राचार्य ए. के. पटेल, एस. एन. चौधरी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्राचार्य एल. एन. चौधरी यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सचिव सजन पाटील, मोतीलाल पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. भूषण निकम यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य खेडकर, श्रीमती शोभना आदींनी संयोजन केले.

## सहविचार सभा

येथील शहादा तालुका को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वरिष्ठ महाविद्यालयात नुकतीच सहविचार सभा झाली. प्राचार्य ए. के. पटेल अध्यक्षस्थानी होते. सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन समित्यांचे गठन करण्यात आले. समित्या व सहभागी सदस्य असे : सांस्कृतिक समिती - प्रा. अंजली महाजन, भूषण निकम, संतोष आगळे, अनिल पाटील. परीक्षा समिती- रवींद्र खेडकर, संदीप मराठे, अनिल जगदाळे. भित्तिपत्रक समिती- भूषण निकम, किरण सोलंकी, कल्पना पाटील. स्वच्छता समिती - भूषण निकम, अंबालाल पटेल. क्रीडा समिती - एस. एस. बोडरे, अनिल पाटील, किरण सोलंकी, जयश्री पटेल. शिस्तपालन समिती - व्ही. एस. बोडरे. सहल समिती - किरण सोलंकी, सुलोचना वानखेडे. नियतकालिक समिती- भूषण निकम, संतोष आगळे, आशा पाटील. खरेदी समिती - संदीप मराठे, भूषण निकम. कला वाङ्मय मंडळ समिती - जयश्री पटेल, अंजली महाजन. प्रवेश समिती- जी. एन. पाटील, बी. जी. पाटील, शिवलाल वसावे, सुलोचना वानखेडे.




■ शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दोनदिवसीय चर्चासत्रात पूजन करताना प्रा.विलास चव्हाण. सोबत प्राचार्य डॉ.आर.डी.पाटील, डॉ.एस.पी.गिरासे, व्याख्याते बी.डी.पाटील, प्रा.ए.के.पटेल, प्रा.भूषण निकम.

# सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार

## शहादा विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात चर्चासत्रातील सूर

**शहादा, दि.१०-** सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार प्रेरणादायी असल्याचे विचार वक्त्यांनी व्यक्त केले.

शहादा तालुका को-ऑप.एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवायोजना, सर्वोदय आश्रम, सर्वोदय मंडळ मुंबई, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यातर्फे 'सामाजिक बदलासाठी गांधीजींचे विचार' या विषयावर चार सत्रांमध्ये चर्चासत्र घेण्यात आले.

जिजामाता महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय, आय.एम.आर.डी. महाविद्यालय व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय या महाविद्यालयांमधून घेण्यात आलेल्या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प्रथम सत्रासाठी गांधी विचाराने प्रेरित झालेले चरणभाई देसाई हे व्याख्याते होते. संस्थाध्यक्ष मोतीलाल पाटील अध्यक्षस्थानी होते. एल.एन.चौधरी यांनी प्रास्ताविक केले. या वेळी विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी, आय.एम.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.एस.पी.गिरासे, कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम उपस्थित होते.

चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष जयदेवभाई पाटील होते. प्रा.डॉ.पीतांबर सरोदे प्रमुख व्याख्याते होते. त्यांनी गांधीजींच्या अहिंसावादी प्रणालीतून कशाप्रकारे सामाजिक बदल घडण्यास मदत झाली याबाबत मनोगत व्यक्त केले. प्रा.तावडे यांनी या सत्रादरम्यान सूत्रसंचालन केले.

तिसऱ्या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा.विलास चव्हाण होते. शेठ व्ही.के. शहा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बी.डी. पाटील यांनी गांधी तत्त्वज्ञानाबद्दल मनोगत व्यक्त केले. प्रा.जितेंद्र पाटील यांनी आभार मानले. अध्यक्षीय मनोगतातून प्रा.विलास चव्हाण यांनी गांधीजी एक सामान्य माणूस होता व त्याचे रूपांतर महात्म्यात कसे झाले याचा इतिहास उलगडून दाखविला.

चर्चासत्राच्या चौथ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ.विलासभाई पटेल होते. प्रमुख व्याख्याते ज्येष्ठ गांधीवादी डी.एच.पाटील व एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी होते. गांधीजींनी सत्याचे प्रयोग या आत्मचरित्रात आपल्या जीवनातील वास्तव मांडून जगापुढे आदर्श ठेवला. त्याप्रमाणे आपणही आपल्या जीवनातील खऱ्या गोष्टी लिहून त्याचे मनन करणे गरजेचे आहे, असा उपदेश विद्यार्थ्यांना केला.

संस्थेचे सचिव विलासभाई पटेल यांनी गांधीजींच्या खरे बोलण्याच्या सवयीचा अंगीकार करून विद्यार्थ्यांना जीवन जगण्याची पंचसूत्री सांगितली.

प्रत्येक चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. यशस्वितेसाठी प्रा.पठाण, प्रा.तावडे, विनायक पाटील आदींनी सहकार्य केले.

# ण्य नगरी चा रंगच न्यारा !



# शहादा येथे गांधी विचार परीक्षा

१३ नोव्हें २००९
(शुक्रवार)

**शहादा, दि.१२ -** येथील शहादा तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात महात्मा गांधी विचार परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व गांधी तत्त्वज्ञान केंद्र धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयस्तरावर महात्मा गांधी यांचे विचार सामान्य माणसापर्यंत पोहोचावेत या उद्देशाने परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महिला कला महाविद्यालय, एम.सी.एम. फॅशन डिझायनर आदींसह विविध शाखेतील ३४८ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या या परीक्षेत महाविद्यालयाचे सर्वात जास्त विद्यार्थी बसले होते. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत महात्मा गांधीजीच्या विचार प्रणालीवर आधारित पुस्तकांचे वाटप करण्यात आले. परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी महिला कला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन. चौधरी, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य ए.के.पाटील, प्रा.भूषण निकम, कार्यालयप्रमुख शरद पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील यांनी गांधी परीक्षेचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांना परीक्षेविषयी माहिती दिली.

सोमवार १५ फेब्रु २०१८ आपला महाराष्ट्र




# शहाद्यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या एक पुस्तक भेट अभियानाचा समारोप

शहादा दि. १४ (प्रतिनिधी) : श.ता. को.ऑप.एज्यु.सोसायटी संचलित विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे राबविण्यात आलेल्या एक पुस्तक भेट योजना या अभियानांचा समारोप नुकताच झाला.

सदर अभियानाचा प्रारंभ ज्येष्ठ नागरिक भागूजी सांगळे व संस्थेचे मानद सचिव ए. के. पाटील यांच्या उपस्थिती ५ जानेवारी रोजी करण्यात आला होता. अभियानाचा मुळ उद्देश वाचन संस्कृतीत वाढ होवून ज्ञानवृध्दी व्हावी हा होता. अभियानाचे नॉट मी बट यू या ब्रिदानूसार रासेयोच्या ८० विद्यार्थ्यांनी सामाजिक जागृती करीत अभियान राबविले. अभियान कालावधीत प्रा. भुषण निकम, प्रा. सोनाली पाटील, प्रा. हर्षल खैरनार, प्रा. सविता पाटील यांनी विद्यार्थ्यांसमवेत परिसरातील शाळा, महाविद्यालये व पालकांकडे जावून जुनी पुस्तके जमा केली. या अभियानास पालकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या स्तूत्य उपक्रमाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले. सदर अभियानाचा समारोप संस्थेचे अध्यक्ष मोतिलाल पाटील यांच्या उपस्थितीत नुकताच करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सदर उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले.

पुण्यनगरी (२५ जाने २०१६) शहादा

# शहादा विज्ञान महाविद्यालयात युवा दिन साजरा

**शहादा:** येथील श.ता.को.ऑप.एज्यु.सोसायटी संचलित विज्ञान वरीष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाधिकारी प्रा.सोनाली पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी मयुरी पाटील, नेहा पटेल, अंकिता पाटील, देवेंद्र निकुंभे उपस्थित होते. प्रा.भुषण निकम यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचोलन धनंजय सोनवणे यांनी केले. आभार योगिता राजपूत हीने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रासेयो स्वयंसेवकांनी कार्य केले.

लोकमत नंदुरबार, शनिवार, दि. १७ जानेवारी २०१५

# विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात स्पर्धा

शहादा- शहरातील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात 'आजचा युवा आणि स्वामी विवेकानंद' या विषयावर घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत २८ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रसंगी प्रा.भूषण निकम यांनी मार्गदर्शन केले. या वेळी प्रभारी प्राचार्य ए.के पटेल उपस्थित होते.

# शहाद्यात जुने साहित्य संग्रहित करण्याचा रासेयोचा उपक्रम

**शहादा :** शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील रासेयोच्या विद्यार्थ्यांकडून जुने पुस्तक, कथा व कादंबऱ्यांचा संग्रह करण्याचा उपक्रम राबविला जात आहे.

संगणक व मोबाइलच्या युगात वाचन व लिखाणापासून युवक वर्ग दूर जात आहे. युवकांना या प्रवाहात आणण्यासाठी विज्ञान महाविद्यालयातील प्रा.भूषण निकम हे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने जुनी पुस्तके, कथा, कादंबऱ्या आदी साहित्याचा संग्रह करण्याचा उपक्रम राबवीत आहेत. आतापर्यंत ३०० जणांकडून त्यांनी अशी पुस्तके गोळा केली आहेत.

युवा पिढीला वाचन व लेखनाकडे वळविण्याच्या या उपक्रमाचे संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, मानद सचिव प्रा.अंबालाल पाटील, जि.प. सदस्य अभिजित पाटील यांनी कौतुक केले.

(वार्ताहर)

# विज्ञान महाविद्यालयात रासेयोदिनी सांस्कृतिक कार्यक्रम

देशदूत २८ सप्टे २०१३ (शनिवार)

**शहादा (ता.प्र.)-** येथील शहादा तालुका को.ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

फक्त युवा शक्तीच्या निर्धारामुळे आणि युवकांना मुक्तपणे आपले अभिव्यक्ती. स्वातंत्र्य व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात प्रामुख्याने एकूण १८ प्रकारातून विविध प्रकाराचा अभिनव अविष्कार सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साकारण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. सदर कार्यक्रमासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.पंकज नन्नवेर, सहाय्यक सुनिल पाटील व शहादा तालुक्याचे 'रासेयोचे विभागीय समन्वय डॉ.अविनाश निकम प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते.

डॉ.नन्नवरे यांनी येथील रासेयो एककाच्या कार्याचा गौरव केला व अशाप्रकारे आदिवासी बहुल भागात उत्कृष्ट काम केल्याने सर्वांचे अभिनंदन केले. डॉ.अविनाश निकम यांना समाधान व्यक्त करत या छोटयाशा युनिटचे आदर्श निर्माण केल्या अशा प्रकारच्या भावना व्यक्त केल्या पाहूण्याचे स्वागतासाठी प्राचार्य ए.के. पाटील, कार्यक्रमाधिकारी नयना कुलकर्णी आदी उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व नियोजन, कार्यक्रमाधिकारी भूषण निकम यांनी तर सुत्रसंचालन सचिन कोळी यांनी केले.

आपला महाराष्ट्र

शनिवार १० जानेवारी २०१५

## प्रा.भुषण निकम यांचे समुपदेशन

शहादा दि. ९ (प्रतिनिधी)- प्रकाशा येथील सर्वोदय माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील समुपदेशन केंद्रात प्रा. भुषण निकम यांनी गट समुहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले. विद्यार्थ्यांनी दिशाहीन न होता स्वत:साठी दिशा दर्शक कसे बनावे? १२ वी नंतर काय? कोणत्या शाखा पारंपारीक शिक्षणापेक्षा वेगळ्या आहेत या बाबत प्रा. निकम यांनी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मेकॅट्रॉनिक्स, ऑप्टीकल केमिस्ट्री, पेट्रोकेमिकल, हवाई सुंदरी, स्पर्धा परिक्षा आदींमध्ये संधी शोधावी. यावेळी मुख्याध्यापक [illegible] चौधरी यांच्यासह शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. सैय्यद मुदस्सर यांनी सुत्र संचलन व आभार व्यक्त केले.

## विज्ञान महाविद्यालयात एड्स जनजागृती सप्ताह

शहादा दि. ९ (प्रतिनिधी) : येथील श.ता.को.ऑप.एज्यु.सोसा. संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय एड्स जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहरातून घोषणांसह रॅली काढण्यात आली. पोस्टरच्या माध्यमातून चित्ररुपाने संदेश देण्यात आलेत. यावेळी महाविद्यालयात भिंतीपत्रकाचे प्रदर्शनही करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा. ए. के. पटेल, प्र. प्राचार्य नयना कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. भुषण निकम व रासेयोच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

आपला महाराष्ट्र

मंगळवार १५ जानेवारी २०१३

# वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयातर्फे रासेयो शिबीरात बेटी बचाव अभियान

शहादा (का.प्र.)- येथील श.ता.को.एज्यु. सोसा. संचलित, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर शहादा नगर पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पवार यांच्या उपस्थित संपन्न झाले. शिबीरादरम्यान बेटी बचाव व स्त्रीभ्रुण हत्या थांबविण्यासाठीची जनजागृती करुन निबंध व वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष जयदेव पाटील होते.

तिखोरा ह्या दत्तक गावात आरोग्यासाठीच्या स्वच्छता विषयक बाबीवर डॉ. विलास पटेल, डॉ. स्मिता जैन ह्या तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने तर कायदेविषयक आणि पर्यावरण संरक्षण व संवर्धन करीता ॲड. जसराज संचेती, डॉ. यु.व्ही निळे आदींनी मार्गदर्शन केले. समारोपा प्रसंगी डॉ. पंकज पवार यांनी स्त्रीयांनी पुढे आले पाहिजे व स्त्री भ्रुण हत्ये विरुध्द आपणास कोणत्याही स्वरुपाची शासकिय मदत तात्काळ उपलब्ध करवून देण्यात येईल. त्या बाबतची सतर्कता व जाणीव लक्षात घेवून कार्य करण्याचे आवहन केले. जयदेव पाटील यांनी समाजविघातक कृत्यासाठी महिलांनाच कारणीभूत न धरता पुरुषानेही आपल्या जबाबदाऱ्यांचे पालन करावे असे उदबोधन केले. शिबीरार्थी विद्यर्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील यांनी विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर हितगूज साधले. समारोप कार्यक्रमा वेळी विविध मान्यवर प्रामुख्याने अभिजीतभाई पाटील, प्रा. ए. के. पटेल, कार्यक्रम अधिकारी प्रा नयना कुलकर्णी, प्रा. डॉ. दिपाली गावंडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

समारोप कार्यक्रमा वेळी प्रास्ताविकातून रा. से. यो. सहप्रमुख प्रा. भूषण निकम यांनी शिबीरात उपस्थित ३० विद्यार्थी, विद्यार्थीनींनी केलेल्या कामाबाबत माहिती दिली.

तसेच शिबीरादरम्यान राबविलेले विविध उपक्रम व त्यासाठी केलेले प्रयत्न अशा सर्व विषयांवर माहिती दिली. शिबीर यशस्वी झाल्याने संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील यांनी सर्व प्राध्यपकांचे अभिनंदन केले.

शेवटी सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश वसू यांनी आलेल्या पाहुण्याचे व गावकऱ्यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रतिक्षा पाटील, शालीनी जायस्वाल, कविता बाफना, मनिषा पाटील या विद्यार्थीनींनी केले.




उपक्रम : टाकाऊपासून टिकाऊ वस्तूच्या उपक्रमातून विद्यार्थी व शिक्षकांनी तयार केलेल्या वह्यांचे वाटप करताना संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील. सोबत अभिजित पाटील, मुख्याध्यापक रामोळे, डॉ.विलास पटेल, नरेंद्र शहा आदी.

# ११०० विद्यार्थ्यांना वह्यांचे संच वाटप

## रासेयो : शहादा येथील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम

शहादा : आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी येथील वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी अभिनव उपक्रम राबवित ११०० वह्यांचा संच तयार केला.

शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी 'टाकाऊपासून टिकाऊ वस्तू'च्या माध्यमातून आर्थिक व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी रद्दीवाले व मित्रांकडून जुन्या वह्या गोळा करून त्यातील कोरी पाने काढून त्यांची बाईंडिंग करीत ११०० वह्यांचा संच तयार करुन होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना शुक्रवारी दिल्या.

दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दत्तक घेण्यात आलेल्या गावांतील विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील यांच्या हस्ते वाटप केल्या.

विद्यार्थी व शिक्षकांनी राबविलेल्या उपक्रमाचे संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष जयदेव पाटील, मानद सचिव डॉ.विलास पटेल, महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एल.एन. चौधरी, प्रभारी प्राचार्य ए.के. पाटील, जिल्हा परिषद सदस्य अभिजित पाटील यांनी कौतुक केले.

(वार्ताहर)

# प्रा. भुषण निकम यांचे समुपदेशन

शहादा दि. ९ (प्रतिनिधी)- प्रकाशा येथील सर्वोदय माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील समुपदेशन केंद्रात प्रा. भुषण निकम यांनी गट समुहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले. विद्यार्थ्यांनी दिशाहीन न होता स्वत:साठी दिशा दर्शक कसे बनावे? १२ वी नंतर काय? कोणत्या शाखा पारंपारीक शिक्षणापेक्षा वेगळ्या आहेत या बाबत प्रा. निकम यांनी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मेकॅट्रॉनिक्स, ऑप्टीकल केमिस्ट्री, पेट्रोकेमिकल, हवाई सुंदरी, स्पर्धा परिक्षा आदींमध्ये संधी शोधावी. यावेळी मुख्याध्यापक [illegible] चौधरी यांच्यासह शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. सैय्यद मुदस्सर यांनी सुत्र संचलन व आभार व्यक्त केले.

# श.ता. को.ऑप विज्ञान महाविद्यालयात आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा

शहादा दि.१९ (का.प्र.): येथील श.ता.को.ऑप एज्यु सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दि. २८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत विद्यापीठस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी नंदुरबार, धुळे व जळगांव जिल्ह्यातील एकूण ११० महाविद्यालयातील सुमारे ३०० ते ४०० विद्यार्थी सहभागी होतील.

कार्यशाळेसाठी सहभागी विद्यार्थी हा शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ह्या कालावधीत शिक्षण घेत असावा अशा प्रकारची पात्रता ठेवण्यात आली आहे. सदर कार्यशाळेत महाविद्यालयीन युवकांची समाजाप्रती भुमिका व निरनिराळ्या समस्यांमध्ये अथवा संकट काळामध्ये निर्णय क्षमता वाढीला लागणे ही गरज लक्षात घेवून निसर्ग निर्मित संकटांना जसे पूर, आग लागणे, भुकंप तसेच मानव निर्मित दंगली, युध्द या सारख्या आणिबाजीच्या प्रसंगी जिवीत व वित्तहानी **(पान ८ वर)**

आपला महाराष्ट्र २० फेब्रु २०१४
(गुरुवार)

## आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा

पासून संरक्षणासाठी व सकारात्मक कर्तव्याची भावना वाढीस लागण्यासाठी युवकांचा सहभाग महत्त्वपुर्ण असल्याने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी आपात्कालीन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, नगरपालिका शहादा, तहसिल कार्यालय शहादा यांची मदत घेण्यात येणार आहे. तसेच तज्ज्ञ मंडळीचे मार्गदर्शन व विविध आपत्कालीन प्रसंगाचे प्रात्याक्षिके सादर केली जाणार आहेत. डॉ. पंकजकुमार नन्नावरे समन्वयक उमवि जळगांव यांचे मार्गदर्शनात कामकाज सुरु असून त्यासाठी शिबीर समन्वयक प्रा. भुषण निकम व विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. सचिन पाटील, शिबीर संयोजकांची जबाबदारी पुर्ण करीत आहे. त्यास संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, प्रा. ए. के. पटेल यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

# विज्ञान महाविद्यालयात विविध उपक्रम

शहादा : विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय शहादाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागातर्फे विविध उपक्रम साजरे करण्यात आले.

प्रमुख वक्ते प्रा.पुरुषोत्तम पाटील व प्रा.सचिन पाटील यांनी मार्गदर्शन केले. या वेळी मीनल गिरासे, तृप्ती पाटील, दीपाली साटोटे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष जयदेवभाई पाटील, सचिव विलासभाई पाटील, प्राचार्य जे.पी. बिऱ्हाडे, उपप्राचार्य एच.वाय. पठाण, प्रा.एच.एम. पाटील, सी.व्ही. चौधरी, प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, प्रा.ए.के. पाटील यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

◆ सद्भावना दिन, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थिनी शालिनी जयस्वाल, पूजा पाटील, सीमा पाटील, राजश्री रावल या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे आयोजन केले.


कार्यक्रमासाठी सचिन कोळी, प्रतीक्षा पाटील, गणेश गिरासे, नीतेश पाटील यांनी व सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम, विनायक पाटील, चंद्रकांत भोपे, राहुल पाटील यांनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)

# विज्ञान महाविद्यालयात म.गांधी-शास्त्री जयंती

शहादा (का.प्र.): येथील श.ता.को.ऑप.एज्यु. सोसा. संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात गांधी जयंती व लाल बहादुर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीचे संवर्धन करुन त्यात वाढ करावी ह्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्गत गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव यांच्या मार्फत आयोजित गांधी विचार परिक्षेचे आयोजन केले. सदर परिक्षेत महाविद्यालयातील २२५विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला तर परिक्षेनंतर गांधी जयंती निमित्त गणेश गिरासे, चित्राबेन पटेल यांनी मनोगत व्यक्त केलींत. या सर्व परीक्षेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. भुषण निकम यांनी केले. उपक्रमाचे कौतूक संस्थेचे चेअरमन मोतीलाल फ.पाटील, प्राचार्य डॉ.आर.डी.पाटील, प्रा.ए. के. पटेल यांनी केले. शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

लोकविश्वास टाइम्स

# विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना




नंदुरबार- येथील श.ता.को.ऑप. एज्यु. सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना दैनंदिन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली बिजुगुणी प्रकृती, सोशल मिडीयाचा वाढता प्रभाव या कारणामुळे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना आपल्या ध्येयापासून दूर जातांना आढळत आहे.परिणामी महाविद्यालयातील विद्यार्थीनींची छेड काढणे, परिसरात सर्रास मोबाईलवर बोलत बसणे, तासिकाकडे लक्ष न देता महाविद्यालयाच्या पायरीवर किंवा कट्ट्यावर बसून राहणे या सर्व घटनांमुळे बाहेरच्या टवाळखोर मुलांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढल्याचे लक्षात आले.

मुलींना असुरक्षिततेची भावना जाणवू लागल्यामुळे महाविद्यालयाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने महाविद्यालयातील मुलींचे निर्भया पथक स्थापना केले आहे. सदर पथकातील मुलींची नावे सुरक्षेच्या कारणास्तव गोपनीय ठेवण्यात आली आहे. या पथकाला पोलीस उपअधीक्षक पी.टी. सपकाळे, महिला हेकॉ. मराठे व ॲड. एस.पी.गवारे यांनी मार्गदर्शन केले. कोणताही अनुचित प्रकार महिला किंवा मुलीच्या बाबतीत उद्भवत असेल तर त्यास पोलीस विभागाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे अश्वस्त करुन या पथकातील मुलींचे मनोधैर्य वाढविण्यास मदत केली. या कार्यक्रमावेळी संस्थेचे सचिव ए.के.पटेल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.पाटील, आय.एम.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.जे.जे.पाटील, एस.एन.डीटी. महाविद्यालयाचे के.जे.अनपट, प्रा.तमखाने, तर विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील प्रा.हर्षा पटेल, सुवर्णा पटेल, मयुरी पाटील, युगंधरा पाटील, ललिता पाटील, प्रा.दिपक पाटील व इतर प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचलन व प्रास्ताविक प्रा.भूषण निकम यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.सोनाली पाटील, हर्षा पटेल आदींनी परिश्रम घेतले.

# विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा :** विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेले विजुगीषी प्रवृत्ती, सोशल मीडियाचा वाढता प्रभावामुळे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना आपल्या ध्येयापासून दूर जाताना आढळा आहे. परिणामी महाविद्यालयीन विद्यार्थिनींची छेड काढणे आदी प्रकारांमुळे या पथकाची निर्मिती करण्यात आली आहे.

मुलींना असुरक्षिततेची भावना जाणवू लागल्यामुळे महाविद्यालयाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे निर्भया पथक स्थापन केले आहे. या पथकातील मुलींची नावे सुरक्षेच्या कारणास्तव गोपणीय ठेवण्यात आली आहे. या पथकाला उपविभागीय पोलीस अधीक्षक पी.टी. सपकाळे, महिला हे.कॉं.मराठे, अ‍ॅड.एस.पी. गवारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संस्थेचे सचिव ए.के. पटेल, प्राचार्य डॉ.एस.डी. पाटील, आय.एम.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.जे.जे. पाटील, एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे के.जे. अनपट, प्रा.तमखाने तर विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील प्रा.हर्षा पटेल, सुवर्णा पटेल, मयुरी पाटील, युगंधरा पाटील, ललिता पाटील, प्रा.दीपक पाटील उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा.भूषण निकम यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रा.सोनाली पाटील, हर्षा पटेल यांनी पथक स्थापनेसाठी विद्यार्थिनींना प्रेरित केले होते.

# पोलीस कर्मचाऱ्यांसाठी रक्षाबंधन



■ बामखेडा । वार्ताहर-

शहादा येथील. विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पोलीस कर्मचाऱ्यासाठी रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शहादा येथील श.ता.को.ऑप.एज्युकेशन संस्थेच्या विज्ञान वरीष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. आज येथील पोलीस उपाधीक्षक कार्यालयात स्वातंत्र्य दिन व नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थिनीनी घरापासून दूर असलेले पोलीस कर्मचाऱ्यांना एकांत वाटू नये व कर्तव्य बजावत असताना महाविद्यालयीन तरुणींमधील पोलीसांबद्दलची आदरयुक्त भिती कमी व्हावी व स्नेहभाव वृद्धीगत व्हावा, ह्या उद्देश्याने राष्ट्रीय सेवा योजना व निर्भया पथकातील विद्यार्थिनींनी येथील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे औक्षण करून राखी बांधून ह्या बंधू रायास संरक्षणाची जबाबदारी सोपवली. यावेळी प्रामुख्याने वाहतूक, एल.सी.बी. व विविध विभागातील सर्व पोलीस कर्मचारी ,अधिकारी उपस्थित होते. डी.वाय.एस.पी.पुंडलिक सपकाळे यांनी विद्यार्थीनीचे अभिनंदन केले . हा रक्षाबंधन सर्वच विद्यार्थिनींकरीता एक आगळा वेगळा क्षण होता, अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.भूषण निकम यांनी विशेष मेहनत घेतली. संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष हिरालाल पाटील, सेक्रेटरी ए.के.पाटील, प्राचार्य डॉ. एस.डी.पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# विज्ञान महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा :** शहरातील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. या क्लबच्या अनुषंगाने एड्स आजाराबाबत नागरिकांमध्ये असलेली मतभिन्नता लक्षात घेऊन जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयातील १५ जणांचा एक क्लब स्थापन करण्यात आला. याप्रसंगी त्यांना विविध मार्गदर्शनपर प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाचा वापर करीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात व सार्वजनिक ठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम सादर करून या आजाराबाबत असलेली भीती व गैरसमज दूर करावी या उद्देशाने या गटाची स्थापना करण्यात आली आहे.

याप्रसंगी आरोग्य विभागाचे नितीन मंडलिक, विश्वास सूर्यवंशी, गणेश कासार व अमोल सोनवणे उपस्थित होते. या मान्यवरांनी एड्सविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ.एस.डी. पाटील उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा.भूषण निकम यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी मराठे तर आभार प्रा.सोनाली पाटील यांनी मानले. यासाठी शिवराय शेलार, भूषण भोई, दर्शना जमदार, भूषण गमे, शुभम पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# शहाद्यात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे रस्ता सुरक्षा सप्ताहात जनजागरण

आ. महाराष्ट्र 10 डिसें 2013 (मंगळवार)

शहादा (का.प्र.) : येथील श.ता.को.ऑप.एज्यु. सोसा. संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रस्ता अपघात अकाली मृत्यू मुखी पडणाऱ्या युवा वर्गाची संख्या लक्षात घेता महाराष्ट्र शासनाच्या रस्ता सुरक्षा जागृती अभियानाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अभियानातील जनजागृतीच्या प्रयत्नाना अधिक गती मिळावी या हेतूने दि.१ते०७डिसेंबर या कालावधीत रस्ता सुरक्षा व सुरक्षीत वाहतुक सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्यात सुरक्षा वाहतुक उपक्रमांतर्गत महाविद्यालयात पोस्टर्स स्पर्धा, हेल्मेटचे पुजन तसेच रस्ता सुरक्षीतेच्या जनजागृतीसाठी रॅली, व्याख्याने व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. पोस्टर्स स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुरक्षीत वाहतुकीविषयी विविध पोस्टर्स सादर केलेत. रस्ता सुरक्षतेतेसाठीचे नियम व नियमांच्या अंमलबजावणीबाबत शहादा पोलिस स्टेशनचे वाहतुक विभागाचे ए.एस.आय. हरीभाऊ चौधरी, पोलिस कॉं. विलास पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी हेल्मेट पूजन प्रा. ए. के. पटेल, प्रा. नयना कुलकर्णी, जितेंद्र गिरासे व पो.कॉं. रघुनाथ मराठे यांनी केले. तसेच रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस. सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. भुषण निकम, शिक्षकेत्तर कर्मचारी राहुल पाटील, किशोर पाटील, राकेश पाटील यांनी सहकार्य केले.



लोकमत दि. ११/१२/२०१३ (बुधवार)

ईश्वर पाटील

# रस्ता सुरक्षा सप्ताहांतर्गत शहाद्यात जनजागृती रॅली




**जनजागृती :** शहादा येथे रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीचा हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करताना हरिभाई चौधरी. सोबत प्रा.ए.के. पाटील, प्रा.भूषण निकम आदी.

**शहादा :** रस्ता सुरक्षा व सुरक्षित वाहतूक सप्ताहानिमित्त शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीत प्रा.ए.के. पटेल, कार्यक्रम अधिकारी प्रा.नयना कुलकर्णी, प्रा.भूषण निकम, वाहतूक शाखेचे जमादार हरिभाई चौधरी सहभागी झाले. रॅलीसाठी पो.कॉ. रघुनाथ मराठे, जितेंद्र चौधरी, राहुल पाटील, किशोर पाटील, राकेश पाटील आदींनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)

# रासेयोच्या विद्यार्थ्यांकडून वाहतुकीबाबत जनजागृती

## शहादा : निबंध स्पर्धा, पथनाट्याचे आयोजन

शहादा : शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान व वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नागरिकांना स्वरक्षणार्थ रस्त्यावरील नियमांचे पालन कशा पद्धतीने केल्याने आपण स्वत:चे व निरपराध नागरिकांचे प्राण वाचवू शकतो यासंदर्भात जनजागृती करण्यात आली.

रस्ता सुरक्षा अभियान व सुरक्षित वाहतुकीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रस्ता सुरक्षा एक जीवनदायी उपक्रम असून, सुरक्षा ही एक काळाची गरज आदी विषयांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच भित्तीपत्रकांच्या माध्यमातून प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे शहरातील विविध प्रभाग, बस स्टॅण्ड, भाजी मार्केट परिसरात पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी शहादा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेविषयी विविध नियमांची माहिती दिली. हे अभियान यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम, प्रभारी प्राचार्या नयना कुलकर्णी, प्रा.ए.के. पटेल यांचे मार्गदर्शन लाभले. (वार्ताहर)